महा पारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सूचना का अधिकार RIGHT TO INFORMATION

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**CIN No. U40109MH2005SGC153646**


**प्रेषक :**
**कार्यालयाचे नांव :** कार्यकारी अभियंता, ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग, न्यू कोयना
**कार्यालयीन पत्ता :** मु.पो.पिंपळी (बु), ता.चिपळुण, जि.रत्नागिरी- ४१५ ६०४
**दुरध्वनी** : का. (०२३५५) २३०१८९
**ईमेल :** ee3140@mahatransco.in
**वेबसाईट :** www.mahatransco.in


जा.क्र.काअ/४००केव्ही/विभाग/न्युको/मासं/ 00411 दि. 30 AUG 2024

## जाहीर सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग,न्यु कोयना अंतर्गत सन २०२४ करीता आय.टी.आय. वीजतंत्री शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता भरती घेण्यात येत आहे. याकरीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्तींना अधिन राहून पात्र विदयार्थ्यांनी/उमेदवारांनी दि.१७.०९.२०२४ चे रात्री २३.५९ वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर आस्थापना क्र.E05202701232 वर नोंदणी करुन ऑनलाईन अर्ज करावे.

| आस्थापनेचे नाव व नोंदणी क्र. | ट्रेड (Trade) | एकुण जागा |
|---|---|---|
| 400 KV RECEIVING STATION DIVISION MSETCL NEW KOYNA ( E05202701232 ) | वीजतंत्री (Electrician) | ६ |

१. ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख १७.०९.२०२४ चे रात्री २३.५९ वाजेपर्यंत राहील.
२. शैक्षणिक अर्हता - महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
३. विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहील.
४. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचे अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनेस बंधनकारक राहणार नाही.
५. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे शिकाऊ उमेदवारीकरीता जागांचा तपशिल व आरक्षण लागु असेल.

| अजा १३ % | अज ७ % | विजाअ ३ % | भजब २.५ % | भजक ३.५ % | भजड २ % | विमाप्र २% | इमाव १९ % | आदुघ १० % | साशैमाप्र १० % | खुला २८ % | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | २ | ६ |

६. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस. सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आय.टी.आय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्ड नमुद केलेले नाव सुसंगत असावे.
७. एस.एस. सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आय.टी.आय उत्तीर्ण गुणपत्रिका मुळप्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.
८. उमेदवाराची सही, पालकांची सही, जातीचा प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी. गुण, आय.टी.आय. गुण ही माहिती अचूक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.
९. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

पुढील पानावर ...

१०.शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करुन योग्य रीतीने ऑनलाईन अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

११.वयोमर्यादा १८ ते ३० वर्षे (मागास प्रवर्गाकरीता ०५ वर्ष शिथिलक्षम)

१२.ऑनलाईन अर्ज सादर करताना उमेदवाराने सद्य:स्थितीत कार्यान्वित असणारा ईमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. ईमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारावर राहील.

१३.दि.१७.०९.२०२४ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१४.आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधीत कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकाराक राहील.

१५.शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणतीही अधिकार प्राप्त होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१६.ऑनलाईन अर्ज प्राप्त उमेदवारांना दस्तऐवज/शैक्षणिक कागदपत्रे पडताळणी करीता ईमेलव्दारे दिनांक, वेळ व स्थळ कळविण्यात येईल. त्याकरीता खाली नमूद केलेल्या दस्तऐवजांसह व शैक्षणिक कागदपत्रांसह उमेदवारांनी उपस्थितीत रहावे.

अ.पासपोर्ट साईज फोटो-२ (रंगीत)
ब. ऑनलाईन नोंदणीचे दस्तऐवज व शैक्षणिक कागदपत्रे (मुळ प्रती)
क.शाळा सोडल्याचा दाखला, बोर्ड प्रमाणपत्र.
ड. आय.टी.आय. गुणपत्रक (चारही सत्र)
इ.मागासवर्गीय असल्यास, जात प्रमाणपत्र.
ई.आधारकार्ड, बँक पासबुक ( मुळ प्रत)

१७.सदर भरतीकरीता महापारेषण कंपनीचे वेळोवेळी प्रसारीत केलेले संबंधित परिपत्रके, नियम, अटी व शर्तींना लागू राहतील.

१८.उमेदवारांची निवड एस.एस. सी. गुण व आय.टी.आय. चे चारही सत्रांच्या गुणांची बेरीज आणि त्यांची सरासरीनुसार होईल व मौखिक चाचणी घेतली जाणार नाही किंवा इतर कोणतेही गुण ग्राहय धरण्यात येणार नाही.

(व्ही.एम.बनसोडे)
**कार्यकारी अभियंता**
**४००केव्ही.ग्र.कें.विभाग,न्यु कोयना**